के.सी.ई. आय. एम. आर मध्ये आय. टी. फेस्टाचे आयोजन

के.सी. ई. सोसायटीचे इन्स्टीट्युट  ऑफ मनेजमेंट ॲण्ड रिसर्च, जळगाव येथे येथे दिनांक २७ व २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्तरावरील दोन दिवसीय आय. टी. फेस्टा-2026 चा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कॉम्पुटर ॲण्ड ॲप्लिकेशन क्षेत्रातील विद्यार्थ्यांना त्यांच्या नवकल्पना सादर करण्यासाठी आणि तांत्रिक कौशल्यांचे प्रदर्शन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाअंतर्गत आयटी क्विझ, पोस्टर सादरीकरण, सॉफ्टवेअर प्रदर्शन आणि सी प्लस प्रोग्रामिंग स्पर्धा अशा चार प्रमुख स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सर्व स्पर्धांसाठी एकूण ४२६ विद्यार्थानिक सहभाग नोंदविला. किसान कॉलेज व आर.एल. कॉलेज पारोळा, जी.जी. खडसे कॉलेज मुक्ताईनगर, डी.एन. कॉलेज फैजपूर, धारीवाल कॉलेज जामनेर, गोदावरी कॉलेज, एसएसबीटी कॉलेज, केसीई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲंड मॅनेजमेंट तसेच जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट यांसह विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे उद्घाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील कॉम्पुटर सायन्स स्कूलचे वरिष्ठ प्राध्यापक व संचालक प्रा. आर. जे. रामटेके यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. बी. व्ही पवार सर, डीन, श्री. एस.एन. खान आदी उपस्थित होते. रामटेके सर यांनी  विद्यार्थांना संबोधित करतांना त्यांनी क्वांटम ॲनालिसिस आणि त्याचे संगणक विज्ञान क्षेत्रातील उदयोन्मुख उपयोग याबाबत मार्गदर्शन केले.

पहिल्या दिवशी (२७ फेब्रुवारी) पोस्टर सादरीकरण व आयटी क्विझ स्पर्धा पार पडल्या. पोस्टर स्पर्धेसाठी डॉ. प्रियांका बर्हाटे, डी. एन. कॉलेज, जळगाव. व डॉ. दिपाली किरंगे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचे आयोजन सौ. अंकिता तिवारी व सौ. शमायला शेख यांनी केले. तसेच आयटी क्विझ स्पर्धेचे आयोजन प्रा. भावना जावळे व प्रा. कोमल मोरे यांनी केले.

दुसऱ्या दिवशी सी. सी. प्लस प्लस प्रोग्रामिंग स्पर्धा व सॉफ्टवेअर प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सी. सी. प्लस प्लस प्रोग्रामिंग स्पर्धेसाठी सौ. कल्याणी नेवे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचे आयोजन सौ. रोहिणी चौधरी व सौ. सेजल नेहते यांनी केले. सॉफ्टवेअर प्रदर्शनासाठी इंटेलोब्लूम इंटरॲक्टिव्ह लर्निंग्स प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक गौरव पाटील व टेक्नोटक्स सोल्यूशन्सचे संचालक योगेश पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. श्वेता रमाणी व प्रा. कुलवंत महाले यांनी केले.

IT Quiz स्पर्धेमध्ये  प्रथम– लोकेश भगवान पाटील, अनिकेत अविनाश वैद्य, द्वितीय – ऋषिकेश मुकेश पाटील, ऋत्विक सुधाकर पाटील,  तृतीय – आशीष रामलाल पाटील, हर्षल सुनील मराठे.

पोस्टर प्रेझेंटेशन: प्रथम – विनती संजय सोनवणे, द्वितीय – सौरव ज्ञानेश्वर गावली, गौतम राजकुमार चांदनानी, तृतीय – जैना खोना

सी.सी.प्लस प्लस प्रोग्रामिंग स्पर्धा : प्रथम – ऋषिकेश मुकेश पाटील, द्वितीय – उदय व्ही. चौधरी, तृतीय – नेहा वाय. मराठे

सॉफ्टवेअर प्रदर्शन: प्रथम – कोमल मनोज वाघ, अपूर्वा सुनील पाटील, द्वितीय – आकाश रत्नाकर नर्खेडे, दर्शन राजेंद्र भामरे, तृतीय – सोहेल कच्छी, सुमेध बन्सोडे

कार्यक्रमाच्या समारोपासाठी  प्रमुख अतिथी म्हणून प्रा. सतीश कोल्हे (स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस, कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ), तसेच श्री. गौरव पाटील (इंटेलोब्लूम इंटरॲक्टिव्ह लर्निंग्स प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक )आणि श्री योगेश पाटील (टेक्नोटक्स सोल्यूशन्सचे संचालक )उपस्थित होते. आयटी फेस्टाचे संयोजन सौ. चारुता खडके व सौ. भाग्यश्री निशाणे यांनी केले असून  संस्थेचे संचालक प्रा. बी. व्ही. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम

यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आय. टी. फेस्टा- 2026 ला मोठे यश मिळाले असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक व नवोपक्रमशील क्षमतांना चालना मिळत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.